Nagar rachana

# शेगांव नगर परिषद कार्यालय, शेगांव
## जि.बुलडाणा

फोन नं :- ०७२६५-२५२०१५ ईमेल :- co.shegaon@gmail.com

जा.क्र.नपाशे/नरवि/235 /२०२१ दि. 26/02/२०२१

प्रति,

मा. सहसंचालक,
नगर रचना, अमरावती विभाग, अमरावती.

विषय :- मौजे शेगांव भाग -२ येथील सर्वे नं. २९९/१ मधील भुखंड क्र.२ व ३ वरील बांधकाम परवानगी करीता अट शिथीलता प्रदान करणेबाबत.

संदर्भ :- १) श्री कैलास भगवानदास शर्मा यांचा बांधकाम परवानगी अर्ज दि. १२/०६/२०१५.
२) श्री. कैलास भागवानदास शर्मा यांचा विनंती अर्ज दि.०५/०२/२०२१.

महोदय,

विषयांकित प्रकरणी संदर्भ क्र.१ अन्वये श्री कैलास भगवानदास शर्मा यांनी मौजे शेगांव भाग-२ येथील सर्व्हे नं. २९९/१ मधील भुखंड क्र. २ व ३ वर बांधकाम परवानगी करीता या कार्यालयात रितसर अर्ज दाखल केला आहे.

त्यानुसार प्रकरणाचे अवलोकन केले असता सदर भुखंड मा. अप्पर जिल्हाधिकारी बुलडाणा यांचे आदेश क्र.एन.ए.पी.३४/शेगांव/४७/१०/२०११ दि.२०/०१/२०१२ रोजी मंजुर झालेल्या अभिन्यासातील दिसुन येतात. तसेच विकास शुल्क भरणा नगर परिषदेमध्ये केलेला आहे.

परंतु जागेचे प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता जागेवर बांधकाम पुर्ण झाल्याचे दिसुन येते. तसेच आवेदकाने सादर केलेल्या नकाशानुसार बांधकाम जागेवर दिसुन येते. परंतु एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रात्साहन नियमावलीतील तरतुद क्र.१.३(९३)(xiv)(iii) नुसार सदर विद्यमान इमारत Special building संज्ञेत सामाविष्ट होत असल्यामुळे Special building करीता उक्त नियमावलीतील तरतुद क्र.२.२.८ नुसार समोर, पाठीमागुन, बाजुने ६ मी. सामासीक अंतर आवश्यक आहे. परंतु जागेवर प्रत्यक्षात ६ मी. सामासिक अंतर सोडल्याचे दिसुन येत नाही.

त्याअनुषंगाने प्रकरणात आवेदकाने संदर्भ क्र.२ नुसार शिथीलता मिळणेबाबत विनंती केली आहे. त्यानुसार प्रकरणी अवलोकन केले असता मंजुर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील तरतुद क्र.२.४ नुसार शिथीलता प्रदान करणे संदर्भात मा. सहसंचालक नगर रचना अमरावती विभाग अमरावती यांना प्रस्ताव पाठविणे आवश्यक आहे.

करीता सदर प्रकरण पुढील कार्यवाहीस्तव सविनय सादर.

आपला विश्वासु

मुख्याधिकारी,
नगर परिषद, शेगांव

नगर परिषद कार्यालय नगररचना विभाग शेगांव

189

Canusmany you
23/03/2021

लिपीक
द्वारा, सहसंचालक, नगर रचना
अमरावती विभाग, अमरावती

O/C.

महाराष्ट्र शासन
नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग
अमरावती विभाग, अमरावती

☎[कार्यालय] ०७२१/२५७०२२६
E-mail : jdtp.amravati@maharashtra.gov.in/jdtpdn_amravati@rediffmail.com

"निलगिरी" डॉ.अग्रवाल यांची इमारत
कॉंग्रेस नगर रोड, अमरावती

जा.क्र. वि.यो. शेंगाव /शिथिलता/स.नं. २९९/१/ सहसंनरअम/ ५६० दि. ०४ /०५/२०२१

प्रति,

सहायक संचालक
नगर रचना, बुलडाणा.

**विषय** :- मौजे शेगांव भाग-२ येथील स.नं. २९९/१ मधील भुखंड क्र.२ व ३ वरील बांधकाम परवानगी करीता अट शिथीलता प्रदान करणेबाबत.

**संदर्भ** :- मुख्याधिकारी नगर परिषद शेगांव यांचे कार्यालयीन पत्र क्र. नपाशे/नरवि/२३५ दि. २६.०२.२०२१

विषयांकित प्रकरणी मुख्याधिकारी नगर परिषद, शेंगाव यांची या कार्यालयास सादर केलेले संदर्भिय पत्राची छायांकित प्रत पाठवित आहे.

सबंधीत बांधकाम प्रकरणातील नगर परिषद कडील मुळ धारिका प्राप्त करुन उक्त पत्राचे अनुषंगाने आपले कार्यालयाच्या मुद्येसुद अहवाल सादर करावा.

सहपत्र- वरीलप्रमाणे

(मुळ मसूदा मा. सहसंचालक यांचे मान्यतेने)

(प्र.कि.दांदळे )
नगर रचनाकार
सहसंचालक, नगर रचना
अमरावती विभाग,अमरावती यांचे कार्यालय

प्रत- मुख्याधिकारी नगर परिषद शेगांव यांना उचित कार्यवाहिस्तव रवाना.
सबंधीत धारिका सहायक संचालक, नगर रचना, बुलडाणा कार्यालयास सत्वर उपलब्ध करण्यात यावी.

०००

महाराष्ट्र शासन
नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग,
बुलडाणा शाखा

दुरध्वनी क्रमांक : 07262/242237
E-mail ID-tp_buldhana@rediffmail.com

प्रशासकीय इमारत, पहिला माळा,
कक्ष क्र.7-ब बस स्टॅंड समोर,बुलडाणा.

---

जा.क्र.मौ.शेगांव/स.नं.२९९/१/भू.क्र.०२व०३/ससंनरबु/ ८६५ दि. २८/०६/२०२१

प्रति,

मा.सहसंचालक, नगर रचना,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :-** मौ.शेगांव भाग-२ येथील स.नं.२९९/१ मधील भुखंड क्र.०२ व ०३ वरील बांधकाम परवानगी करीता अट शिथीलता प्रदान करणेबाबत.

**संदर्भ :-** १.आपले पत्र क्र.वि.यो.शेगांव/शिथिलता/स.नं.२९९/१/सहसंनरअम/५७०, दि.०४.०५.२०२१.
२.मुख्याधिकारी, नगर परिषद, शेगांव यांचे आपल्या कार्यालयास पत्र क्र.२३५/२०२१, दि.२६.०२.२०२१.
३. मुख्याधिकारी, नगर परिषद, शेगांव यांना आपले पत्र क्र.९३३, दि.२८.०८.२०१८

महोदय,

विषयांकित प्रकरण या कार्यालयास संदर्भिय पत्र क्र.०१ अन्वये प्राप्त झाले असून आपण विषयांकित प्रकरणी सबंधीत बांधकामाबाबत मुद्देसुद अहवाल अपेक्षिला आहे. उक्त प्रकरणी संदर्भिय पत्र क्र.०२ अन्वये मुख्याधिकारी, नगर परिषद, शेगांव यांनी UDCPR १.३(९३) (xiv)(iii) अन्वये उक्त बांधकाम हे special Building च्या संज्ञेत समाविष्ट होत असल्यामुळे special Building करीता UDCPR २.२.८ प्रमाणे समोर, पाठीमागून व बाजूने ६ मी समासिक अंतरे सोडणे अपेक्षित असून तसे विद्यमान बांधकाम नकाशामध्ये सोडल्याचे दिसून येत नसल्याने विभागीय कार्यालयाकडे तरतूद क्र.२.४ नूसार शिथीलता प्रदान करण्याकरिता सादर केले आहे. तरी उपरोक्त संदर्भिय पत्र क्र.१ व २ च्या अनुषंगाने अहवाल खालील प्रमाणे सादर करीता आहे.

उक्त प्रकरणी अप्पर जिल्हाधिकारी यांनी आदेश क्र.एन.ए.पी.३४/शेगांव/४७/२०१०-२०११ दि.२०.०१.२०१२ रोजी निवासी / वाणिज्य प्रयोजनार्थ अकृषक आदेश पारीत केले आहे. उक्त मंजूर अभिन्यास नकाशामधील भूखंड क्र.०२ व ३ चे क्षेत्रफळ अनुक्रमे ७४५.०० चौ.मी. व ४६४.५० चौ.मी. असे आहे. उक्त अभिन्यास नकाशामध्ये भूखंड क्र.०२ व ३ हे खामगांव –शेगांव रोड, सन्मुख असून अभिन्यासामध्ये खामगांव ते शेगांव रस्त्यास लागू ६ मी. रुंद सेवा रस्ता मंजूर करण्यात आला आहे. विद्यमान बांधकाम नकाशाचे अवलोकन केले असता Site Plan मध्ये दर्शविल्याप्रमाणे सदर बांधकाम नकाशामध्ये UDCPR तरतूद २.२.८ प्रमाणे समोर, बाजूने व मागच्या बाजून ६.० मी. सामासिक अंतरे सोडणे अपेक्षित होते. परंतू बांधकाम करते वेळी तसे करण्यात आल्याचे दिसून येत नाही. तसेच उक्त बांधकाम नकाशामध्ये खामगांव ते शेगांव रस्ता सन्मुख ०.७० मी. उत्तर बाजून १.१५ मी पश्चिम बाजून २.०० दक्षिण बाजूने ०.७० मी. समासिक अंतरे सोडल्याचे दिसून येते.

उक्त अभिन्यास नकाशामध्ये खामगांव ते शेगांव रस्तया सन्मुख ६.० मी. सेवा रस्ता मंजूर असून उक्त् सेवा रस्ता उक्त अभिन्यासा पुरता मर्यादित असून लगतच्या अभिन्यासामध्ये सेवा रस्ता प्रस्तावित / मंजूर नसल्याचे स्थळ निरीक्षण अंती दिसून आले. तसेच लगतच्या अभिन्यासाच्या मध्ये सेवा रस्ता विकसीत होणे शक्य नसल्याचे निदर्शनास आले. तेव्हा उक्त सेवा रस्त्याची जागा उक्त अभिन्यासासमोर मोकळी आहे. उक्त सेवा रस्ता मोकळा असल्याने खामगांव ते शेगांव रस्त्यास इमारती मुळे बाधा होत नाही. सदर बाब लक्षात घेता उक्त मंजूर अभिन्यासातील भूखंड क्र.०२ व ३ मध्ये इमारती करीता रस्त्यासन्मुख बाजूने सेवा रस्त्याची जागा असल्याने व इतर बाजून UDCPR मधील तरतूद क्र.२.४ अन्वये शिथिलता २.४ मध्ये नमूद अटींवर प्रदान करण्यास हरकत नाही. असे मत आहे.

तसेच यापूर्वी आपले पत्र क्र.९३३ दि.२८.०८.२०१८ अन्वये शासन निर्णय क्र.टिपीएस-१८१४/सीआर ८२/१४/नियम/नवि-१३, दि.०७.१०.२०१७ अन्वये तयार केलेल्या नियमातील अ.क्र.८ नुसार रहिवास विभागातील विषयांकित अनधिकृत विकास प्राथमिक संरचना म्हणून घोषित करण्यास विचारात घेता येईल व सदर घटकांच्या अनुषंगाने निकषांचे काटेकोरपणे पालन करुन आवश्यक शुल्काचा भरणा केल्यानंतर सदर प्रकरणी विद्यमान बांधकाम दि.३१.१२.२०१५ पूर्वीचे असल्यास प्राशमित संरचना म्हणून घोषित करण्यास हरकत नसल्याबाबत कळविले आहे. उपरोक्त शासन निर्णयाबाबत साक्षंकता असल्याकारणे मा.उच्च न्यायालयाने उक्त निर्णयास स्थगिती चे आदेश दिले आहे त्यामुळे उक्त शासन निर्णयान्वये नियमाकुल करणे शक्य होत नसल्याने नव्याने मंजूर UDCPR मधील तरतूदीनूसार शिथिलता प्रदान करण्याचे अधिकार मा.सहसंचालक, नगर रचना यांना प्रदान करण्यात आले आहेत. उक्त बाब लक्षात घेता उक्त बांधकामा बाबत शिथिलता प्रदान करण्यात हरकत नाही अशी या कार्यालयाची धारणा आहे.

तसेच उक्त मंजूर अभिन्यासामध्ये भूखंड क्र.०२ व ३ हे स्वतंत्र भूखंड आहेत. उक्त भूखंडाचे एकत्रिकरण करणे आवश्यक आहे. नकाशावर दर्शविल्याप्रमाणे भूखंडाचे एकत्रिकरण करण्यास हरकत नसावी अशी या कार्यालयाची धारणा आहे.

पुढील आदेशास्तव सविनय सादर.

**(मुळ मसुदा मा. प्र.सहायक संचालक यांचे मान्यतेने)**

आपली,

(वै.पु.गाठे)

सहायक संचालक, नगर रचना,

शाखा कार्यालय,बुलडाणा करिता